कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. एकाग्रता, कष्ट व निष्ठा या तीन गुणांच्या बळावर तुम्ही कोणत्याही क्षेत्रातील हिमालय करू शकाल, असा मोलाचा संदेश संस्था प्रतिनिधी ज्ञानेश्वर शेंडगे यांनी विद्यार्थ्यांना दिला. क्रीडा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी व्हॉलिबॉल व ॲथलेटिक्स खेळ प्रकाराचे सादरीकरण करण्यात आले. क्रीडा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी खो-खो, कबड्डी तसेच इंडोर गेम्स चेस, कॅरम आदी सामने खेळविण्यात आले. स्पर्धांचे पंच म्हणून गणेश पडवळकर, प्रा. सचिन शेंडगे यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष नानासाहेब निकम यांनी शुभेच्छा दिल्या. स्पर्धा यशस्वीतेसाठी क्रीडा समितीतील सर्व प्रमुख विश्वनाथ कुंभार, गणेश पडवळकर, प्रसाद कुलकर्णी, चैताली जाधव, सपना दोडमिसे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

यांनी व्यक्त केला. चालू हंगामाकरिता नोव्हेंबर २०२३ अखेर पुरवठा केलेल्या उसाचे बिल प्र.मे.टन रु. २ हजार ७०१ प्रमाणे ऊस पुरवठादार सभासद शेतकऱ्यांच्या सोयीनुसार यापूर्वीच खात्यामध्ये वर्ग केले असून डिसेंबर २०२३ च्या पहिल्या पंधरवड्याचे ऊस बील लवकरच देण्याची व्यवस्था करत असल्याचे चेअरमन शिवानंद पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी व्हाईस चेअरमन तानाजी खरात, संचालक मुरलीधर दत्तू गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणू पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर आदी उपस्थित होते.

महत्व दिले. वाढदिवसानिमित्त आयोजित रोजगार मेळाव्यातून सांगोला तालुक्यातील हजारो बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देत त्यांचे संसार उभा करू शकलो, याचा मला मनस्वी आनंद आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील यांनी केले.

दीपक साळुंखे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, ७ जानेवारी रोजी रोजगार मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यासाठी देशातील नामांकित अशा 'यशस्वी फाऊंडेशन' संस्थेने पुढाकार घेतला होता. सांगोला तालुक्यात प्रथमच आयोजित रोजगार मेळाव्याला प्रतिसाद मिळाला. यामध्ये ३ ते ४

सांगोला : निवड झालेल्या उमेदवाराला निवडीचे पत्र देताना माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील. यावेळी उपस्थित अन्य मान्यवर.

हजार तरुणांनी नाव नोंदणी केली होती. या मेळाव्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या सिरम इन्स्टिट्यूट, फिनोलेक्स, महिंद्रा यासारख्या अन्य ३७ नामांकित कंपन्या समाविष्ट होत्या. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सांगोला विद्यामंदिर प्रशालेत मुलाखतीद्वारे निवड करून जागेवरच. ९५० तरुणांना नामांकित कपन्यांनी नियुक्तीपत्र देऊन निवड केली. या निवडीमुळे हजारो तरुणांच्या चेहऱ्यावर हसू फुलले होते.

दीपकआबा म्हणाले, ग्रामीण भागात अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आर्थिक विवंचना

डोळ्यात आनंदाश्रू तरळले. मुले-मुली आणि पालकांनी डोळ्यात आनंदाचे अश्रू घेऊनच माजी आमदार दीपकआबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

असताना शिक्षण घेऊनही तरुण-तरुणींच्या हाताला काम नसल्याने बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होत चालला होता. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठीच कार्यकर्त्यांनी मेळावा आयोजित केला. मेळाव्यातून ज्या तरुणांना नोकरी मिळाली त्यांनी आपल्या संस्थेत किंवा कंपनीत प्रामाणिकपणे काम करून कुटुंबाची जबाबदारी पार पाडावी, असेही आवर्जून नमूद केले.



अकलूज : लेझीम स्पर्धेचे उद्घाटन करताना मदनसिंह मोहिते-पाटील. यावेळी पो. नि. दीपरत्न गायकवाड, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, दीपकराव खराडे-पाटील, सचिव अभिजित रणवरे आदी. दुसऱ्या छायाचित्रात लेझीम सादर करताना माळेवाडी येथील सावता माळी विद्यालयाच्या विद्यार्थिनी.

अकलूज येथे राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेला प्रारंभ

प्रतिनिधी
अकलूज

संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्यावतीने ८ ते १० जानेवारी २०२४ या कालावधीत आयोजित केलेल्या १८ व्या राज्यस्तरीय लेझीम स्पर्धेला प्रारंभ करण्यात आला.

विजय चौक येथे स्पर्धेचे उद्घाटन बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते मैदान पूजन करून झाले. यावेळी अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपरत्न गायकवाड, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, मंडळाच्या कार्याध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, दीपकराव खराडे-पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, महादेव अंधारे, लक्ष्मण आसबे, सुनंदा फुले आदी उपस्थित होते.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष व जयसिंह मोहिते पाटील व मदनसिंह मोहिते-पाटील या बंधूंच्या अमृत महोत्सवी वाटचालीनिमित्त सदरच्या स्पर्धाचे आयोजन केले आहे. यावेळी मदनसिंह मोहिते-पाटील, दीपरत्न गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

ग्रामीण खेळाचे जोपासक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळांने आजपर्यंत ४० हजार पेक्षा अधिक लेझीम खेळाडू निर्माण केले आहेत. 'गीनिज वर्ल्ड बुक' मध्येही अकलूजच्या महालेझीम खेळाची नोंद झाली आहे.

स्पर्धेचा प्रारंभ सावता माळी विद्यालय, माळेवाडी या मुलींच्या संघाने खेळ सादर करुन झाला. प्रस्ताविक नामदेव कुंभार यांनी केले तर किरण सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले.

Jain Minority Institution
Seth Sakharam Nemchand Jain Aushadhalaya Trust's
SETH GOVINDJI RAOJI AYURVED MAHAVIDYALAYA
(Grant in Aid by Govt. of Maharashtra)
21/A/13, Budhwar Peth, Samrat Chowk, Solapur – 413 002.
Phone: 0217-2324736, E-mail : principal@sgrayurved.edu.in

WALK IN INTERVIEW ON 16/01/ 2024

Candidates are invited along with original and attested photo copies of essential certificates on **16/01/2024 at 11 a.m.** for temporary appointments on following **Non-Aided posts.** No TADA will be issued.

Sr. No.	Subject	Post	No. of Vacant Post
1	Dravyaguna	Assistant Professor	1 (Open)
2	Shalyatantra	Assistant Professor	1 (Open)
3	Prasuti Evam Striroga	Associate Professor	1 (Open)
		Assistant Professor	1 (Open)

QUALIFICATIONS, EXPERIENCE & AGE OF TEACHERS :
(As per norms of NCISM, New Delhi and MUHS, Nashik
Ref. : Central council of Indian Medicine Notification Dated 16/02/2022 and MUHS Direction No. 01/2017.)

GENERAL NOTES :
1. As our institute is Jain Minority Institute, reservation is not applicable.
2. **All posts are non-aided posts and to be filled purely on temporary basis on institutional level.**
3. Pay scale is as per rules.
4. Apply to Principal, Seth Govindji Raoji Ayurved Mahavidyalaya, Solapur on a plain Paper along with original and attested copies of Certificates & Experience Certificates.

Dr. Veena G. Jawale
In-charge Principal

Dr. Pradeep J. Kothadia
Hon. Secretary